# दै.दिव्य वार्ताचा आज वर्धापन सोहळा

## वाचक, जाहिरातदार, हितचिंतक, शुभचिंतक यांनी उपस्थित रहावे -संपादक

वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-शनिवार दि. २२ फेब्रुवारी २०२५ पाने ४ किंमत ३

# ‘२५ तारखेनंतर कुणाचंही ऐकणार नाही’

## सुरेश धसांकडे मस्साजोगच्या ग्रामस्थांच्या आठ मागण्या

केज, (दिव्य न्युज):- भाजपचे आमदार सुरेश धस यांनी संतोष देशमुखांचे भाऊ धनंजय देशमुख आणि मस्साजोगच्या ग्रामस्थांची शनिवारी (२२ फेब्रुवारी) भेट घेतली. या भेटीवेळी ग्रामस्थांनी आठ मागण्या केल्या. या मागण्या पूर्ण झाल्या नाही, तर २५ तारखेनंतर कुणाचंही ऐकून घेणार नाही, असा इशारा धनंजय देशमुख आणि ग्रामस्थांनी सरकारला दिला. सुरेश धस यांच्याकडे आठ मागण्या केल्या. त्या मागण्या सुरेश धस यांनी भेटीनंतर वाचून दाखवल्या. संतोष देशमुख हत्या प्रकरणात ठोस कारवाई होत नसल्याने धनंजय देशमुख आणि ग्रामस्थांनी २५ फेब्रुवारीपासून अन्नत्याग आंदोलन करण्याची घोषणा केली आहे. सरकारने दोन दिवसांत निर्णय घ्यावा. अन्यथा नंतर कुणाचंही ऐकणार नाही, असा इशारा ग्रामस्थांनी दिला धस यांच्यामार्फत सरकारला दिला.

सुरुवातीला देशमुख कुटुंबीय आणि मस्साजोग ग्रामस्थांनी माझ्यावर विश्वास व्यक्त केला आहे. यामध्ये आता प्रमुख मागण्या ज्या आहेत, त्यात पोलीस निरीक्षक महाजन, पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील यांना बडतर्फ करून सहआरोपी करणे. त्यानंतर धनंजय देशमुख आणि इतर आम्ही चार दिवसांपूर्वी बसलो होतो. त्यावेळी एसआयटीमध्ये सायबर सेलच्या दोन




तज्ज्ञांची नियुक्ती व्हावी, अशी मागणी झाली. ती बाब मी ज्याठिकाणी कानावर ▶▶ पान २ वर

Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com

# दिव्य वार्ता

## महादेव मुंडेंचे खूनी सापडत का नाहीत? परळीत ठाण मांडलेल्या पोलिसांच्या बदल्या करा: सुरेश धस

परळी , (दिव्य न्युज):- येथील महादेव मुंडे खून प्रकरणातील आरोपी १५ महिने होऊनही कसे काय सापडत नाहीत ?पोलीस काय करतात ? असा प्रश्न उपस्थित करून परळीतील पोलीस दलात गेल्या दहा-बारा वर्षांपासून येथेच असलेल्या काही पोलीस कर्मचाऱ्यांच्या बदल्या व्हायला हव्यात व नवीन पोलिसांची नियुक्ती करायला हवी अशी मागणी भाजपाचे आमदार ▶▶ पान २ वर



## भटकत्या आत्मास पंतप्रधान कार्यालयाने मोदींच्या शेजारी कसे बसू दिले?

### संजय राऊतांचा सवाल




मुंबई , (दिव्य न्युज):-तब्बल सात दशकांनी देशाच्या राजधानी दिल्ली येथे ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शुक्रवारी (२१ फेब्रुवारी) साहित्य संमेलनाचे उद्घाटन झाले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे एकाच मंचावर आले होते. पंतप्रधान मोदींनी यावेळी शरद पवारांचा हात पकडून दीपप्रज्वलन केले. यानंतर दोन्ही नेते एकमेकांच्या बाजूला बसल्याचे पाहायला मिळाले. यावरून आता शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी नरेंद्र मोदींवर टीका केली ▶▶ पान २ वर




## धारूर येथे तरुणावर तलवारीने हल्ला; तिघांना तात्काळ अटक

धारूर, (दिव्य न्युज):- धारूर येथील गणेश नडगिरे यांच्यावर १९ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी धारूर-तेलगाव रोडवरील श्रावणी पॅलेस जवळ तिघांनी तलवारीने हल्ला करून गंभीर जखमी केले. जखमीला तातडीने ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी लातूर येथील शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले.

या प्रकरणी धारूर पोलिसांनी तात्काळ कारवाई करत आरोपींना अटक केली आहे. आरोपींची नावे अशपाक खान मोहम्मद शेख उर्फ गुड्डु, उस्मान खान मोहम्मद शेख आणि बबलू खान मोहम्मद शेख अशी आहेत. हे तिघेही धारूर तालुक्यातील गोपाळपूर ग्रामपंचायत हद्दीतील संभाजीनगर येथील रहिवासी आहेत.प्राथमिक तपासानुसार, हल्लेखोरांपैकी दोघांनी तलवारीने जखमीच्या हातावर गंभीर वार केले, तर तिसऱ्या व्यक्तीने लाथाबुक्क्यांनी मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिली.

घटनेनंतर धारूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक देविदास वाघमोडे, उपनिरीक्षक बाबासाहेब भवर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी जलद कारवाई करत तिन्ही आरोपींना अटक केली. २१ फेब्रुवारी रोजी आरोपींना धारूर न्यायालयात हजर करण्यात आले. पुढील तपास धारूर पोलीस करत आहेत.

## धनंजय मुंडे माझे दैवत, वाल्मिक कराड माझे नेते - बालाजी तांदळे

बीड, (दिव्य न्युज):- बीडमधील प्रकरणावरून घेरल्यानंतर कोरेगावचे सरपंच बालाजी तांदळे यांनी मीडियाशी संवाद साधला आहे. तांदळे यांच्यावर जे जे आरोप करण्यात आले आणि आतापर्यंत जे जे घडलं त्यावर बालाजी तांदळे यांनी सविस्तर उत्तर दिलं आहे. आपण पोलिसांवर कसा दबाव टाकू शकतो? मी काय प्रशासनाचा जावई आहे का? असे सवाल करतानाच मी




जर या संपूर्ण प्रकरणात आरोपी असेल तर माझ्यावर कारवाई करा. मला आरोपी करा. पण पुरावे नसताना आणि माझा दोष काहीच नसताना उठसूट सहआरोपी करण्याची मागणी करू नका, असं बालाजी तांदळे यांनी म्हटलं आहे.

आरोपीशी संपर्क आहे का? असा बालाजी तांदळे यांना करण्यात आला. त्यावर, माझा आरोपीची संपर्क असता तर मी आरोपी शोधून देण्यात मदत केली असती का?, असा सवाल बालाजी तांदळे यांनी केला. धनंजय मुंडे माझे दैवत आहेत. वाल्मिक कराड माझे नेते ▶▶ पान २ वर

## कर्नाटकात ड्रायव्हरला काळं फासल्यानंतर एसटीची तोडफोड

बीड, (दिव्य न्युज):- कर्नाटकात कन्नड रक्षक वेदिकेच्या कार्यकर्त्यांनी मुजोरी दाखवली. त्यांनी महाराष्ट्र सरकारच्या एसटी बसवर हल्ला केला. कन्नड रक्षक वेदिकेच्या कार्यकर्त्यांनी एसटी महामंडळाच्या बसला काळं फासलं. एसटी महामंडळाच्या चालकाला मारहाण केली. एसटी महामंडळाच्या चालकाला कन्नड



येते का ? अशी विचारणा केली. या प्रकारानंतर महाराष्ट्र-कर्नाटकमध्ये तणाव निर्माण झाला आहे. मागच्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन राज्यात सीमावादाचा प्रश्न आहेच. महाराष्ट्रातून कर्नाटकमध्ये जाणारी एसटी वाहतूक तात्पुरती थांबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ▶▶ पान २ वर

# उस्मानाबाद-बीड-औरंगाबाद रेल्वे लाईनसाठी तपासणीचे आदेश

## १० फेब्रुवारीला खा.बजरंग सोनवणेंनी केली होती नव्या रेल्वे मार्गासाठी केंद्रीय मंत्र्यांकडे मागणी

केज । दिव्य न्युज

उस्मानाबाद (धाराशिव)-बीड-औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) रेल्वे लाईन प्रकल्पाला मंजुरी देण्याची आणि ती जलद करण्याची मागणी दि.१० फेबुवारी रोजी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली होती. या मागणीची दखल घेत शिवजयंतीच्या मुहूर्तावर केंद्रीय मंत्र्यांनी संबधित रेल्वेमार्गाची तपासणी करण्याचे आदेश रेल्वे संचालकांना दिले आहेत.



खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांना दिलेल्या पत्रात म्हटले होते. उस्मानाबाद-बीड-औरंगाबाद नवीन मार्ग प्रकल्पाचा २८ जुलै २०२२ रोजी रेल्वे बोर्डाला अहवाल सादर करण्यात आला. या प्रकल्पाची एकूण लांबी २४०.१५ किमी आहे. ज्याचा अंदाजे खर्च ४८५७.४७ कोटी रुपये आहे. मराठवाडा प्रदेशात अखंड कनेक्टिव्हिटी प्रदान करण्यासाठी, प्रवासाचा वेळ कमी करण्यासाठी आणि व्यापार आणि उद्योगासाठी नवीन मार्ग उघडण्यासाठी हा रेल्वे मार्ग महत्त्वाचा आहे. याव्यतिरिक्त, प्रस्तावित प्रकल्पाचा-२.४७ टक्केच्या परतावा दराने (आरओआर) आढावा घेण्यात आला आहे. ज्यामुळे रेल्वे नेटवर्कसाठी व्यवहार्य आणि फायदेशीर गुंतवणूक सुनिश्चित होईल. या प्रकल्पात राज्य सरकारसोबत खर्च वाटप मॉडेलचाही समावेश आहे. या प्रकल्पाचे धोरणात्मक महत्त्व लक्षात घेता, या रेल्वे मार्गाचे बांधकाम लवकरात लवकर सुरू करण्यासाठी आवश्यक निधीची मंजुरी आणि काम सुरु करण्यास प्राधान्य देणे. प्रकल्प अंमलबजावणीत आणखी विलंब होऊ नये म्हणून मंजुरी प्रक्रिया जलद करणे. सुरळीत अंमलबजावणीसाठी केंद्र आणि राज्य संस्थांमध्ये समन्वय साधणे यासाठी बीड जिल्ह्याचे खासदार प्रयत्नशील आहेत. हा रेल्वे मार्ग एक महत्त्वाचा दुवा म्हणून काम करेल. ज्यामुळे या प्रदेशात आर्थिक समृद्धी येईल आणि येथील रहिवाशांचे जीवनमान सुधारेल, असे म्हटले होते. यानंतर ९ दिवसाने म्हणजेच शिवजयंतीच्या मुहूर्तावर दि.१९ फेब्रुवारी रोजी केंद्रीय रेल्वेमंत्री यांनी पत्राव्दारे या प्रकल्पास मंजुरी देण्याबाबत प्रकल्पाची व्यवहार्यता व सुविधा तपासणी करण्याचे आदेश संबंधित संचालक यांना देण्यात आले आहेत.



# राष्ट्रीय महामार्ग वृक्षतोडीमुळे वाटसरुंची शितल सावली हरवली ; रस्ते विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा -हास ; पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडेनी वनक्षेत्र व हरित क्षेत्र वाढीसाठी पुढाकार






बीड । दिव्य न्युज

मराठवाड्याचे हरितछत्र अवघ्या ५ व बीड जिल्ह्याचे २.५ टक्क्यांवर आलेले असताना केंद्र आणि राज्य शासनाच्या विकास धोरणानुसार महामार्ग रूंदीकरणाच्या कामांमुळे भविष्यात गतिमान अशी दळणवळण व्यवस्था तयार व्हावी यासाठी रस्ते, महामार्ग रूंदीकरणाची कामे करण्यात आलेली आहेत.रस्ते विकासाच्या नावाखाली रस्ते विकास महामंडळाने धुळे ते सोलापूर व बीड ते अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील शेकडो वर्षापुर्वीची चिंच ,वड, कडुनिंब,पिंपळ, औदुंबर सारख्या झाडांची अक्षरक्ष: कत्तल करण्यात आली असुन नियमानुसार तोडलेल्या झाडांच्या दहापट झाडे लावण्याची जबाबदारी रस्ते विकास महामंडळावर असतानाही याकडे जाणीवपूर्वक कानाडोळा केला जात आहे. महामार्गावरील दोन बाजुंना दुतर्फा असलेल्या जुनाट वटवृक्षांची अभेद्य तटबंदी आणि ईतर अनेक प्रकारच्या वृक्षांची विपुलता असल्याने महामार्गावर प्रवास करताना वाहनचालक व प्रवाशांना आल्हाददायक वातावरणाची अनुभुती मिळत असे मात्र आता महामार्ग रूंदीकरणाच्या कामांमुळे वृक्षतोड झाल्याने वाटसरूंची सावली सुद्धा हिरावली आहे.याबद्दल वृक्षप्रेमी आणि पर्यावरण प्रेमींकडुन नाराजी व्यक्त केली जात असुन सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितिनजी गडकरी आणि पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांना लेखी तक्रार करत वनक्षेत्र व हरित क्षेत्र वाढीसाठी पुढाकार घेण्याची मागणी केली आहे.

वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचा -हास पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडेनी लक्ष देण्याची आवश्यकता :- डॉ.गणेश ढवळे

बीड जिल्ह्यात २.४ टक्के ईतके कमी वनक्षेत्र असुन निसर्गाचा समतोल राखण्यासाठी ३३ टक्के वनक्षेत्र अपेक्षित आहे.बीड जिल्ह्यात वारंवार दुष्काळाचे संकट ओढावत आहे. झाडांच्या मुळांमुळे जमिनीची धुप नियंत्रण राहते.वृक्षतोडीमुळे जमिन नापिक होऊन जैवविविधता कमी होते. वृक्षतोडीमुळे वातावरणातील कार्बन डायऑक्साइडची पातळी वाढते ज्यामुळे तापमान वाढते आणि ग्लोबल वार्मिंगचा धोका वाढतो .जंगलामध्ये अनेक प्राणी पक्षी आणि वनस्पतींचे निवासस्थान असते वृक्षतोड झाल्यामुळे त्यांच्या निवासस्थानाचा नाश होतो आणि त्यांचे जीवन धोक्यात येते त्यामुळे अनेक प्रजाती नामशेष होण्याची शक्यता वाढते. झाडे पाण्याचे संचयन आणि वितरण नियंत्रित करतात .वृक्षतोड झाल्यामुळे पर्जन्यचक्रावर परिणाम होतो, ज्यामुळे पाऊस कमी होण्याची शक्यता वाढते.आणि दुष्काळाचे प्रमाण आवडते .झाडे हवेतील हानिकारक घटक शोषून घेतात आणि स्वच्छता हवा उपलब्ध करून देतात .वृक्षतोड झाल्यानंतर हे प्रदूषण वाढते त्यामुळे मानवाचे आरोग्य धोक्यात येते वृक्षतोडीमुळे या सर्व परिणामांचे संघ पर्यावरणाच्या संतुलनावर मोठा परिणाम करतो पर्यावरणाच्या दीर्घकाळ टिकाऊपणासाठी वृक्षतोड कमी करणे आणि जास्तीत जास्त झाडे लावणे आवश्यक असते.पर्यावरणावर विपरीत परिणाम होत आहे.

वनक्षेत्र आणि हरित क्षेत्र वाढविण्यासाठी शासनाकडून झाडे लावा झाडे जगवा म्हणत कोट्यावधींचा खर्च कागदोपत्रीच करण्यात येत असल्याचे दिसून आले आहे. पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी बीड जिल्ह्यातील वनक्षेत्र आणि हरित क्षेत्र वाढीसाठी पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी पुढाकार घ्यावा अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

पान १ वरून

## ‘२५ तारखेनंतर

घालायची ती घातली आणि त्यांनी ती मान्य केली. सोमवारपर्यंत त्याचे आदेश येतील, असे सुरेश धस यांनी सांगितले. ६ तारखेची घटना, ९ तारखेची घटना एवढ्यापुरती मर्यादीत न ठेवता, घटनांच्या आधीच्या दोन महिन्यांपासून... पहिली जी केस झालेली आहे, १ शिंदे नावाचे अधिकारी उचलून नेले होते, त्यांनी फिर्याद दिली होती. त्यावेळपासूनचे सीडीआर तपासले पाहिजेत. त्यासाठी सायबर सेलचे दोन अधिकारी नेमण्याची विनंती केली आहे, अशी माहिती धस यांनी दिली. महाजन हे बीडला आहे. तो तिथून येऊन केज पोलीस ठाण्यातील लॅपटॉपमध्ये काम करतो. कसं काय बसतो, त्याचा काय संबंध? त्यामुळे सहआरोपी म्हणून महाजन आणि राजेश पाटील या दोघांवर तत्काळ कारवाई व्हावी, अशी मागणी आहे, असे धस म्हणाले.

फरार कृष्णा आंधळे याला तातडीने अटक करणे गरजेचे आहे. कारण हा आंधळे खूप चतुर आहे. त्याचे बगलबच्चे जर एका मोहित्याच्या तिथे ३०७ करू शकतात. हे आरोपी तारखेला येतात, तेव्हा चित्रविचित्र दिसणारे लोक येतात. ते त्यांचे मनोबल वाढवण्यासाठी येताहेत. त्यामुळे कृष्णा आंधळेला अटक होणे गरजेचे आहे, अशी मागणीही ग्रामस्थांनी केल्याचे धस यांनी सांगितले.

वाशीमधील पोलिसांनी मदत केल्याचा आरोप

वाशी पोलीस ठाण्याचे रमेश घुले, पोलीस कॉन्स्टेबल दिलीप गीते, गोरख फड, दत्ता बिक्कड यांचे सीडीआर तपासावेत आणि त्यांना सहआरोपी करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. आरोपींना पळून जाण्यात मदत करणाऱ्या डॉ. संभाजी वायभसे आणि त्यांची पत्नी, वायभसेच्या पत्नीने पैसे पाठवले आणि त्या सरकारी वकील होत्या. यांना सहआरोपी करण्याची मागणी करण्यात आली आहे. मी यासंदर्भात पत्र दिले आहे, अशी माहिती धस यांनी ग्रामस्थांसमोर सांगितले.

शासकीय वकील म्हणून उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करण्यात यावी, ती प्रक्रियेत आहे. त्यात काय अडचण आहे, का थांबली आहे, याबद्दल धनंजय देशमुख यांना खासगीमध्ये माहिती दिली आहे. जलदगती न्यायालयात प्रकरणाची सुनावणी होण्याची मागणी आहे, अशी माहिती धस यांनी दिली.

संतोष देशमुख यांचा मृतदेह बोरगाव शिवारातून उचलल्यानंतर ते केजच्या शासकीय रुग्णालयात आणणे अपेक्षित होते, पण पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील यांनी ही गाडी कळंबच्या दिशेने नेली होती. पण, पाठीमागे गाडी आल्याचे बघून पुन्हा गाडी वळवली. या प्रकरणाची चौकशी करण्यात यावी. कारण पाटील हा यात स्पष्टपणे आरोपी असल्याचे दिसत आहे. आतापर्यंत हा आतमध्ये जायला पाहिजे होता, अशी मागणीही ग्रामस्थांकडून करण्यात आलेली आहे.

नितीन बिक्कडला अटक व्हायला पाहिजे होती -सुरेश धस

नितीन बिक्कड याने धनंजय मुंडेंच्या निवासस्थानी बैठक घेतली. याच बिक्कडने तांबोळी आणि शुक्लाला शासकीय निवासस्थानात बैठक घेतली. मग हा आरोपी कसा होत नाही. हे सगळे आरोपी ज्यावेळी इथून गेले, त्यानंतर वाशीमधून आरोपींना पळून जाण्यात मदत करण्यास नितीन बिक्कडचा वाटा आहे. या आठपैकी दोन मागण्या अंतिम टप्प्यात आहेत. इतर मागण्या लवकरात करण्याची मागणी आहे, असे धस यांनी सांगितले.

या मागण्यांसंदर्भात रविवारी (२३ फेब्रुवारी) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची नागपूरला जाऊन भेट घेईन किंवा सोमवारी मुंबईमध्ये भेटेन. जर मुख्यमंत्र्यांनी काही दिवसांचा अवधी मागितला, तर उपोषण पुढे ढकलावं, अशी विनंतीही सुरेश धस यांनी केली.

## भटकत्या आत्मास

आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना संजय राऊत म्हणाले की, साहित्य संमेलानाच्या व्यासपीठावर राजकारण झाले. काही लोकांचा साहित्य संमेलनात राजकारण करण्याचा अट्टाहास असतो. साहित्यिकांनी एखादे संमेलन राजकारण्यांशिवाय करावे. पंडित नेहरू यांच्या काळात हे चित्र नव्हते. अशी आठवण करून देत संजय राऊत यांनी नरेंद्र मोदी आणि शरद पवार एकमेकांच्या बाजूला बसण्यावरून टीका केली. त्यांनी म्हटले की, शरद पवार हे मोदींपेक्षा वरिष्ठ आहेत. त्यामुळे पंतप्रधानांच्या खुर्चीवर कोणी बसला म्हणजे, तो ज्येष्ठ आणि श्रेष्ठ होत नाही, असे म्हणते राऊत यांनी मोदींवर टीका केली.

संजय राऊत म्हणाले की, साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष शरद पवार आहेत. त्यामुळे मला असे वाटले होते की, मोदी त्यांच्या बाजूला बसणार नाहीत. कारण भटकती आत्माच्या बाजूला पंतप्रधान कसे काय बसतील? पंतप्रधान कार्यालयाने मोदींना शरद पवारांच्या शेजारी कसे काय बसू दिले? शरद पवार भटकती आत्मा आहे ना? असे प्रश्न उपस्थित करत संजय राऊत यांनी मोदींवर खोचक टीका केली.

आदर सन्मान म्हणून मोदी शरद पवारांच्या बाजूला बसले असतील, असा प्रश्न पत्रकारांनी संजय राऊत यांना विचारला. यावर ते म्हणाले की, तुम्ही जे म्हणताय आदर सन्मान हा एक व्यापार आणि तेवढ्यापुरते ढोंग असते. मोदींना आता हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्याबद्दल फार आदर, सन्मान आणि मान आहे. असे ते नेहमी भाषणात सांगतात. पण, बाळासाहेबांची निर्मिती असलेली शिवसेना त्यांनी निर्दयीपणे फोडलीच ना? शरद पवारांनी कष्टातून उभा केलेला पक्ष मोदींनीच फोडला ना? मग कसला आदर, सन्मान आणि मान? देखल्या देवा दंडवत अशी मराठीमध्ये म्हण आहे. अशी टीकाही संजय राऊत यांनी केली.

## धनंजय मुंडे

आहेत. विष्णू चाटे आणि माझे संबंध होते म्हणून तुम्ही सगळा समाज दुश्मन करणार का? सीआयडी ऑफिसमध्ये माझी चौकशी झाली. मी चौकशी करून आलो. ३०० पोलीस असताना मी दाब कसा टाकू शकतो? इतकी दु:खद घटना घडली, त्या घटनेत मी दबाव टाकू शकतो का? असा सवाल बालाजी तांदळे यांनी केला आहे.

तुम्ही आरोपीचा फोटो दाखवून धमकावलं? असा आरोप आहे. त्यावरही त्यांनी प्रतिक्रिया दिली आहे. आता विषय कसा आहे, तुम्ही काही जरी बोलले तरी तुमचं खरं आहे आणि आम्ही खरं तरी बोललो तरी आमचं खोटं आहे. असं लोक समजतात. आमचं विकत नाहीत, विकतय तुमचं खोटं बोलला तरी. याला आरोपी करा, त्याला आरोपी करा, तुम्ही आरोपी किती करणार आहात? आम्ही जर चुकीचं वागत असलो तर आम्हाला शंभर टक्के आरोपी करा. आम्ही दोषी असेल तर पोलिसांनी येऊन आम्हाला अटक करावी. पुरावा असेल तर प्रशासन आम्हाला सोडणार आहे का? आम्ही त्यांचे जावई आहोत का?, असा सवाल त्यांनी केला.

आरोपींना चादर खरेदी करून दिल्याचाही आरोप आहे. त्यावरही त्यांनी प्रतिक्रिया व्यक्त केलीय. मी चादर घेतल्या हे मान्य करतो, मी चादर घेतल्यातच. मला लेकरबाळं प्रपंच काही नाही का? गेवराई पोलीस स्टेशनला सीसीटीव्ही नाहीत का? मला अचानक फोन आला. येताना रग घेऊन या. मी रग घेऊन आलो. मी चादरी घरी आणल्या. वाटलं तर घरी चला मी चादर दाखवतो, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

कृष्ण आंधळे आणि तुमची ओळख आहे का? असा सवाल त्यांना करण्यात आला. त्यावर त्यांनी नाही असं उत्तर दिलं. कृष्ण आंधळे आणि माझा कुठेही अर्थाअर्थी संबंध नाही, असता तर मी सांगितलं असतं. तो मैंदवाडी म्हणजे माजलगाव मतदारसंघातील आहे, केज मतदार संघातील नाही, असं तांदळे म्हणाले.

चर्चा करून परत आलो

पवनचक्की वादप्रकारात घटनास्थळी होता का? असा सवालही त्यांना करण्यात आला. त्यावरही त्यांनी प्रतिक्रिया दिली. मारहाण झाल्यानंतर मी सांगवीला चाललो होतो. अचानक मला त्या ठिकाणी गर्दी दिसली. सगळं प्रकरण संपल्यानंतर मी तिथे गेलो होतो. संतोष देशमुख यांच्यासोबत १५-२० मिनिटे चर्चा करून परत आलो, अशी माहिती दिली.

सहआरोपी करण्याच्या मागणीवरही त्यांनी आपलं मत मांडलं. कुणी आरोपी करा म्हटल्यावर आरोपी होत नाही. हा प्रशासकीय कार्यवाहीचा भाग आहे. मी जर दोषी असेल तर कारवाई आहे. मी काही प्रशासनाचा जावई नाही किंवा नातेवाईक नाही. काही मीडियावाल्यांनी मला आरोपी म्हणून टीव्हीवर पाठीमागे दाखवल आहे. आरोपी बालाजी तांदळे म्हणून मला दाखवलं आहे. मीडियावाले न्याय देवता असल्यासारखे वागत आहेत. डायरेक्ट तुम्ही आम्हाला आरोपी करत आहात. आमच्यावर गुन्हे दाखल झाले असेल तर तुम्ही आम्हाला आरोपी करा, असं त्यांनी सांगितलं.

वाशीतील सीसीटीव्ही फुटेजवरही त्यांनी सांगितलं. वाशीमध्ये जर माझं सीसीटीव्ही फुटेज समोर आलं असेल, त्यात मी असेल किंवा वाल्मिक कराड माझ्यासोबत असेल तर तुम्ही म्हणताल ती शिक्षा भोगायला तयार आहे, असा आव्हानच त्यांनी दिलं.या घटनेच्या आगोदर माझे वाल्मिक कराडशी संबंध होते. ते माझे नेते आहेत. माझ्या नेत्यासोबत मी राहणार नाही का? धनंजय मुंडे आणि वाल्मिक अण्णांचे राज्यात कार्यकर्ते आहेत. त्यामुळे संपूर्ण राज्यातील कार्यकर्त्यांना आरोपी करणार आहात का तुम्ही? असा सवाल करतानाच दिसला कार्यकर्ता तर आरोपी कसं करता येईल? हे चुकीचं होणार नाही का?, असा सवालही त्यांनी केला.कोणत्या आरोपी अटक करताना तुम्ही पोलिसांसोबत होते, असं त्यांना विचारण्यात आलं. त्यावरही त्यांनी थेट माहिती दिली. सर्व आरोपींना अटक करताना मी सोबत होतो. फक्त प्रतिक घुलेंना अटक करताना मी नव्हतो. विष्णू चाटे आणि वाल्मिक कराड यांना सोडता इतर सर्व आरोपींना पकडताना मी होतो, असं त्यांनी सांगितलं.तुम्ही आरोपींची जामीन घेतल्याचा धनंजय देशमुख यांचा आरोप आहे. असं विचारताच त्यांनी आक्रमक उत्तर दिलं. आज पण माझं ओपन चॅलेंज आहे, मी जर आरोपीचा जामीन घेतला असेल तर मला नंबर एकचा आरोपी करा. तुम्ही कोर्टात जा. कोर्टातली पत्र द्या आणि जामीन कोणी घेतली ते बघा. बालाजी तांदळेने जामीन घेतला असेल तर नंबर एकचा आरोपी मला करा. ओपन चॅलेंज आहे माझं, असंही ते म्हणाले.पोलिसांना अजूनही मदत करणार आहात का? या प्रश्नावर त्यांनी होय असं उत्तर दिलं. गरज पडली तर मी १००% मदत करणार आहे. आपण पोलिसांना मदत करणं चुकीचं आहे का ? पोलीस प्रशासनाने सांगितलं तर मी शेवटपर्यंत सुद्धा मदत करायला जाईल, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

## महादेव मुंडेंचे खूनी

सुरेश धस यांनी शनिवारी परळी येथे माध्यमांशी बोलताना केली आहे. येथील पिग्मी एजंट महादेव मुंडे यांच्या कुटुंबियांची आमदार सुरेश धस यांनी भेट घेतली व चर्चा केली.

मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी पतीच्या खुनाबद्दल माहिती दिली व न्याय मिळण्याच्या मागणीसाठी आपण जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या कार्यालयात मंगळवारी उपोषण करणार असल्याचे सांगितले. आपल्या पतीचा काही दोष नसताना खून कसा झाला ? आरोपींना का अटक केली जात नाही? असे सवाल करत मारेकऱ्यांना जोपर्यंत अटक होत नाही तोपर्यंत आपले समाधान होणार नाही, असे ज्ञानेश्वरी मुंडे म्हणाल्या.

महादेव मुंडे यांचे मुळगाव परळी तालुक्यातील भोपळा आहे तर कन्हेरवाडी ही सासरवाडी आहे. परळीत काही वर्ष महादेव मुंडे यांनी एका दुकानावर काम केले. त्यानंतर दुधाचा व्यवसाय केला. पिग्मी कलेक्शन केले व प्लॉटिंगची खरेदीविक्रीचा व्यवसाय केला. २२ ऑक्टोबर २०२३ रोजी परळी तहसील कार्यालयासमोर महादेव मुंडे यांचा मृतदेह आढळून आला. याप्रकरणी परळी शहर ठाण्यात अज्ञाताविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे .परंतु अद्याप या प्रकरणात एकही आरोपी निष्पन्न झाला नाही व आरोपीस अटक करण्यात आले नाही. परळी शहर पोलिसांना या प्रकरणात आरोपी निष्पन्न करता आले नाही त्यामुळे आमदार सुरेश धस यांनी महादेव मुंडे खून प्रकरणातील आरोपी १५ महिन्यानंतर हे अटक का होत नाहीत असा प्रश्न उपस्थित करून पोलीस प्रशासनाचे लक्ष वेधून घेतले. त्यानंतर नवीन जिल्हा पोलीस अधीक्षकांनी शहर पोलिसांचा तपास काढून अंबाजोगाई चे उपविभागीय पोलिस अधिकारी अधिकारी अनिल चोरमले यांच्याकडे देण्यात आला त्यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक नेमण्यात आले आहे.

आरोपी लवकर सापडतील अशी आशा

विशेष पथकाचे पोलीस निरीक्षक संतोष साबळे व चार हवालदार या प्रकरणाचा आता तपास करत आहे .पोलीस निरीक्षक साबळे हे चांगले आहेत .निश्चितच या प्रकरणातील आरोपी सापडतील अशी आशा आमदार सुरेश धस यांनी शनिवारी माध्यमांशी बोलताना व्यक्त केली यावेळी त्यांच्यासोबत राजेसाहेब देशमुख,सतीश फड उपस्थित होते.

## कर्नाटकात ड्रायव्हरला

कन्नड रक्षण वेदिकेच्या कार्यकर्त्यानी एसटी आणि चालकाला काळे फासण्याच्या घटनेचे हे पडसाद आहेत. ठाकरेंच्या सेनेकडून कर्नाटक सरकारच्या विरोधात आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. सकाळी दहा नंतर कोल्हापुरातून कर्नाटकला जाणारी वाहतूक थांबवण्यात आली आहे. परिस्थिती पाहून एसटी सेवा पूर्ववत सुरू केली जाणार असल्याची माहिती आहे. कर्नाटकात एसटी चालकाला झालेल्या मारहाणीच्या निषेधार्थ कोल्हापूरात ठाकरे गट आक्रमक. ठाकरे गटाचं मध्यवर्ती बस स्थानकाबाहेर कर्नाटक बस अडवून आंदोलन.

महाराष्ट्र आणि कर्नाटकमध्ये बेळगाववरुन सीमावाद आहे. त्यावरुन दोन्ही राज्यात हिंसक आंदोलनं झाली आहेत. कन्नड रक्षक वेदिकेच्या कार्यकर्त्यांनी मुजोरी दाखवली आहे. त्यामुळे पुन्हा एकदा महाराष्ट्र-कर्नाटकमध्ये सीमा प्रश्न चिघळण्याची शक्यता आहे. कर्नाटकात कन्नड रक्षक वेदिकेच्या कार्यकर्त्यांनी मुजोरी दाखवण्याची ही पहिली वेळ नाही. याआधी सुद्धा त्यांनी अनेकदा महाराष्ट्रातील वाहनांवर हल्ले केले आहेत. २०२२ साली डिसेंबर महिन्यात बेळगावच्या हिरेबागेवाडी टोलनाक्यावर कन्नड रक्षण वेदिकेच्या कार्यकर्त्यांनी महाराष्ट्राच्या वाहनांवर जोरदार हल्ला केला होता.

# बीडमधील अतिक्रमणावर फिरविला बुलडोजर

## सुभाष रोडवरील अतिक्रमण हटवले;बीड शहराने घेतला मोकळा श्वास





### पुन्हा अतिक्रमण न होण्यासाठी ठोस उपाय करा

शहरातील बहुतांश भागामधील अतिक्रमण हटविण्याची आदर्श मोहिम नगर पालिका प्रशासनाकडून करण्यात येत आहे. परंतू हे अतिक्रमणाचे हातगाडे, टपरी, अन् हॉटेल पुन्हा थाटणार नाही यासाठी नगर पालिका प्रशासनाकडून ठोस उपाय करण्याची मागणी नागरिकातून होत आहे.

### सीओ अंधारेंच्या मोहिमेचे सर्वच स्तरातून कौतुक

शहरातील वाढत चाललेल्या अतिक्रमणामुळे नागरिकांना रस्त्यावरून वाहने चालविणे कठीण होत होते. मात्र अनाधिकृत उभारलेल्या दुकान, टपरी अन हॉटेल चालकांकडून वाहनधारकांना दादागिरी करत दम दिल्याचे अनेक वेळा पहावयास मिळत होते. मात्र मागील चार ते पाच दिवसांपासून सुरू असलेल्या सीओ निता अंधारेंच्या अतिक्रमण हटाव मोहिम कौतुकास्पद असून या मोहिमेचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

बीड । दिव्य न्युज

रस्त्यावरील नालीवर तसेच रस्त्याच्या बाजूना मोकळ्या जागेत अनाधिकृतपणे दुकाने थाटत रस्ता अरुंद करून वाहनांना अडथळा निर्माण करत सर्रासपणे व्यवसाय थाटले होते. या अनाधिकृत हॉटेल, टपरी, तसेच दुकाने थाटणाऱ्यांवर कारवाईचा बुलडोजर फिरविण्याची कुठल्याच अधिकाऱ्यांची धमक होत नव्हती. परंतू कामात कर्तव्यदक्ष अन नेकीने काम करणाऱ्या नगर पालिका मुख्याधिकारी निता अंधारेंनी मागील चार बुलडोजर फिरविण्याची कारवाई करत शहरांना अतिक्रमण मुक्त श्वास दिला असल्याने जे कुणालाच नाही जमले ते सीओ निता अंधारेंनी करून दाखविले असे मत शहरातील नागरिकांकडून व्यक्त होतांना दिसून येत आहे.

नगर पालिकेच्यावतीने मागील चार ते पाच दिवसापासून अतिक्रमण हटाव मोहिम राबवण्यात येत असून या मोहिमेच्या माध्यमातून शहरातील ठिकठिकाणचे अतिक्रमण काढण्यात येत आहे. शुक्रवारी (दि.२१) रोजी शहरातील बशीरगंज ते नवी भाजी मंडई, आदर्श मार्केट, सुभाष रोड, स्टेडियम परिसर, धोंडीपुरा या भागातील रोडवरील अतिक्रमण काढण्यात आले असुन आदर्श मार्केटच्या दुकानासमोरील सर्वच अतिक्रमण काढल्याने व्यापारी आक्रमक होत आज आपले दुकाने बंद ठेवून अतिक्रमणा विरोधात निषेध नोंदवला आहे. बीड शहरातील नगर रोड, बार्शी रोड, राजुरीवेस या भागातील अतिक्रमण हटविण्यात आले आहे. काही ठिकाणी अतिक्रमण पाडापाडी होण्याच्या अगोदर लोकांनी स्वतःहून अतिक्रमण काढून बाजूला ठेवले होते. शिवजयंतीनिमित्त दोन दिवस मोहिम थांबवण्यात आली होती. (दि. २१) रोजी परत सुरू करण्यात आली. काही ठिकाणी अतिक्रमण काढल्यानंतर दुसऱ्या दिवशी त्या जागेवर अतिक्रमण होत असल्याचे दिसत आहेत. मोहिम पुढे चालू मात्र पाठीमागे पुन्हा अतिक्रमण होवू नये यासाठी नगरपालिकेने ठोस निर्णय घेण्याची आवश्यकत आहे. दरम्यान आज शहरातील बशीरगंज ते नवी भाजी मंडई, आदर्श मार्केट या रोडवरील अतिक्रमण काढण्यात आले असुन आदर्श मार्केटच्या दुकानासमोरील सर्वच अतिक्रमण काढल्याने व्यापारी आक्रमक झाले होते.

## बालेपिर परिसरात रुग्णालय क्रीडांगण व्हावे आमदार संदीप भैया क्षीरसागर यांच्याकडे मागणी

बीड । दिव्य न्युज

बीड शहराचे विस्तारीकरण होत असून या भागातील नागरिकांना उपचार करण्यास जिल्हा रुग्णालय यावेळी लागत असल्याने बाले पीर परिसरात प्राथमिक आरोग्य केंद्र सह क्रीडांगण हवे अशी मागणी ही जिल्हा काँग्रेस कमिटी अल्पसंख्यांक विभागाचे शहराध्यक्ष खमरोद्दीन यांनी आमदार संदीप भैया क्षीरसागर यांच्याकडे केली आहे,



दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की येथील नागरिकांना अनेक समस्यांना तोंड घ्यावे लागत आहे प्रभाग क्रमांक ११ मधील रस्ते पूर्ण पणे उखडून गेले आहेत रस्त्यावरील खड्ड्यात गटारीचे घाण पाणी साचत आहे त्यामुळे नागरिकांना याचा नाहक त्रास होत आहे तसेच घंटागाडी येत नाही पिण्याच्या पाण्याची सोय बंद पडलेले पथ दिवे सुरू करावेत नियमित घंटागाडी पाठवून येथील कचरा उचलावा या भागातील अनेक नाल्या तूबल्या आहेत त्यामुळे या नाल्याचे पाणी रस्त्यावरून वाहत असल्याने घाणीचे साम्राज्य पसरत आहे त्यामुळे येथील नागरिकांच्या आरोग्याच्या प्रश्न निर्माण झाला आहे बीड शहराचे बालेपीर विभागात विस्तारीकरण होत असून अनेक वसाहती या परिसरात आहेत या भागात रुग्णालय नसल्याने येथील नागरिकांना उपचारासाठी शहरात यावे लागत आहे त्यामुळे या विभागात प्राथमिक आरोग्य केंद्रसह क्रीडा गण आदी सह नगरी सुविधा देण्याची मागणी एम डी खमरोद्दीन आमदार संदीप भैया क्षीरसागर यांच्या कडे निवेदनद्वारे केली आहे

## नेकनूर येथील पवित्र रमजानच्या महिन्यात लोड शेटिंग व लपंडाव बंद करावे

नेकनूर । दिव्य न्युज

नेकनूर येथील पवित्र रमजानच्या महिन्यात लोड शूटिंग व लपंडाव बंद करावे, सय्यद शोहेब, दरवर्षाप्रमाणे याही वर्षी पवित्र रमजान चा महिना दोन मार्च पासून सुरू होत आहे त्याकरिता नेकनुर येथील भारतीय जनता पार्टी बीड जिल्हा अल्पसंख्यांक सरचिटणीस यांच्याकडून भव्य दिव्य रास्ता रोको आंदोलन एक १,३,२०२५ रोजी हायवे रोड नुरानी चौक येथे बारा वाजता लोड शूटिंग व दिवसभर व रात्री मोठ्या प्रमाणावर विजेचे लपंडाव रमजान एक महिन्यात लाईट जाऊ नये त्याकरिता २८,३,२०२५ पर्यंत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लाईटचे बंदोबस्त न केल्यास १,३,२०२५ रोजी भव्य दिव्य नुरानी चौक येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे लोकशाहीच्या मार्गाने माननीय जिल्हाधिकारी साहेब, अधीक्षक अभियंता महावितरण कंपनी विभाग बीड, श्री कांबळे साहेब कार्यकारी अभियंता, गोचुडे साहेब उपकार्यकारी अभियंता ग्रामीण महावितरण कंपनी बीड, तहसीलदार साहेब तहसील कार्यालय बीड, नामदार पंकजाताई मुंडे साहेबा पर्यावरण व दूध विकास मंत्री महाराष्ट्र राज्य, माननीय नामदार अजितदादा पवार उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री बीड, ऊर्जामंत्री महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई, पोलीस अधीक्षक साहेब बीड, सब इंजिनियर नेकनूर, पोलीस निरीक्षक साहेब पोलीस स्टेशन नेकनूर या सर्वांना लोकशाहीच्या मार्गाने मुस्लिम समाजाच्या पवित्र रमजानच्या महिन्यात लोड शूटिंग बंद करावी मोठ्या प्रमाणावर रात्रंदिवस होणारे लपंडाव बंद करावे व उच्च दाबाची लाईट द्यावी पवित्र रमजानच्या पूर्ण महिन्यात रात्री तीन नंतर इस्त्री यांना स्वयंपाक करण्यासाठी उठावे लागतात व सहेरी करण्यासाठी लहान थोर पुरुष महिला मुले मुली यांना उठावे लागत आहे रात्रीच्या टायमावर लाईट गेल्यानंतर स्वयंपाक करणे कठीण होत आहे त्यात उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे गर्मी आहे कमी दाबाची लाईट येत असल्यामुळे नेहमी लाईट जाता येता त्यांना नेकनूर वासी कंटाळलेले आहे पवित्र रमजानच्या महिन्यात सर्व लोक नमाज साठी मस्जिद मध्ये येत आहे सर्व गावातील मस्जिद पूर्ण भरत आहे जागा अपुरी पडत आहे त्यामुळे एकमेकांची गर्मी व त्यात लाईट गेली तर लोक मस्जिद मध्ये गर्मीमुळे बसू शकत नाही व गावात पत्र्याचे घर असल्यामुळे इस्त्री या थोरमंडळी वयोवृद्ध घरी गर्मीत बसू शकत नाही त्यामुळे लाईटची अत्यंत आवश्यक ता आहे त्याकरिता विजेचे लपंडाव व उच्च दाबाची लोड शूटिंग बंद करावी म्हणून सय्यद शोहेब आमदार ज्येष्ठ नेते समाजसेवक भारतीय जनता पार्टी बीड जिल्हा अल्पसंख्यांक सरचिटणीस यांच्या नेतृत्वाखाली भव्यदिव्य रास्ता रोको नेकनूर हायवे रोडवर नुरानी चौकात १,३,२०२५ रोजी बारा वाजता रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे त्यात नुकसान झाल्यास सर्व जबाबदारी महावितरण कंपनीवर राहील त्याकरिता आमची मागणी मंजूर करावी रिष्ठ सर्वाधिकार्यांना पाच-सहाशे लोकांच्या सह्याचे निवेदन दिलेले आहे सय्यद शोहेब आमदार यांच्यासोबत, मोईज शेख युवा नेते, हाजी शेख सरफराज उद्दिन, काझी नवीन नवीद शेख रिजवान उद्दीन, कुरेशी ऋुरी, तजममुल जागीरदार, व इतर कार्यकर्ते उपस्थित होते

## आशिष शेळके यांच्या VIP OFFICE & VIP REAL ESTATE कार्यालयाचे थाटामाटात शुभारंभ





### आमदार भिमरावजी केराम व बेबीताई प्रदिपजी नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत रमाबाई शेळके यांच्या हस्ते उद्घाटन


किनवट । दिव्य न्युज : विशाल भालेराव

किनवट : शिवजन्मोत्सवच्या दिवशी आशिष शेळके यांनी त्यांचे संपर्क कार्यालय व्हिआयपी ऑफीस व व्हिआयपी रियल इस्टेट या कार्यालयाचे शुभारंभ अत्यंत थाटामाटात व हर्षोल्लास मध्ये केले. आमदार भिमरावजी केराम व बेबीताई प्रदिपजी नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. आशिष शेळके यांच्या आई रमाबाई शेळके यांच्या हस्ते कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. आशिष शेळके यांनी पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले की, किनवट तालुक्यातील हे एकमेव रियल इस्टेट कार्यालय आहे, ज्यांना कुणाला किनवट तालुक्यात कुठेही घर, प्लॉट, शेती इत्यादी खरेदी अथवा विक्री करायची असेल त्यांनी या व्हिआयपी कार्यालयाला अवश्य भेट द्यावे. किनवट तालुक्यातील कुठल्याही भागात, कुठल्याही नगर अथवा कॉलनी मध्ये घर, प्लॉट, शेती खरेदी व विक्री चे सर्व कामे व्हिआयपी कार्यालय मध्ये केले जातील असे शेळके म्हणाले. कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभानंतर लगेच भोजनाची व्यवस्था देखील करण्यात आली होती. या कार्यक्रमास अनेक दिग्गज राजकीय नेते, विवीध पक्षाचे कार्यकर्ते, पत्रकार बांधव, वकील बांधव, पोलिस स्टाफ, तसेच इतर ५०० ते ६०० लोकांच्या उपस्थितीत हा उद्घाटन सोहळा संपन्न झाला.

## एस.के.पी. ग्रुप आणि शुजा स्पोर्ट्स क्लब तर्फे आयोजित समीर काझी चषक बी.एफ.एल.चे थाटात उद्घाटन

बीड । दिव्य न्युज

जिल्हा क्रीडा स्टेडियम येथे एस.के.पी. ग्रुप आणि शुजा स्पोर्ट्स क्लब तर्फे आयोजित समीर काझी चषक बी.एफ.एल. सीजन चार २०२५ चे थाटात उद्घाटन संपन्न झाले. यावेळी मान्यवरांची उपस्थिती होती.





एस.के.पी. ग्रुप आणि शुजा स्पोर्ट्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या समीर काझी चषक बीएफएल सीजन चार २०२५ चे उद्घाटन उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे शहराध्यक्ष तथा उद्योगपती शेख निजाम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी एआयएमआयएम पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ड. शेख शफिक भाऊ, ड. सय्यद खाजा, प्रा. आमेर सलीम, अय्युब खान, जावेद काझी, शेख इम्रान यांची प्रमुख उपस्थिती होती.

या चषकासाठी घेण्यात येणाऱ्या स्पर्धेमध्ये ६ संघांचा समावेश आहे. चषकातील सर्व सामने हे संध्याकाळी ०६:०० ते रात्री १०:०० वाजेपर्यंत साखळी पद्धतीने खेळविण्यात येणार असून २३ फेब्रुवारी २०२५ पर्यंत दररोज सामने रंगणार आहे. विशेष म्हणजे बीड जिल्ह्याच्या इतिहासात प्रथमच रात्रीचे सामने आयोजित करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी ५० हजाराचे प्रथम पारितोषिक एस.के. पी. ग्रुपचे सय्यद शाकेर यांच्या तर्फे तर रणवीर पंडित यांच्यातर्फे २५००० चे द्वितीय पारितोषिक देण्यात येणार आहे. सय्यद कय्युम जागीरदार यांच्याकडून पाच हजाराचा मालिकावीर पुरस्कार, किशोर कागदे यांच्यातर्फे उत्कृष्ट डिफेंडर दोन हजाराचे, आवेज इनामदार यांच्यातर्फे उत्कृष्ट गोलकीपर दोन हजाराचे, डॉ. इमरान खान यांच्यातर्फे उत्कृष्ट मिड फिल्डर दोन हजाराचे, जिल्हाध्यक्ष एस.डी.पी.आय.यांच्यातर्फे उत्कृष्ट फॉरवर्ड दोन हजाराचे पारितोषिके देण्यात येणार आहे. यासोबतच प्रत्येक सामन्यात सामनावीराचे सन्मान चिन्ह ड. सनाउल्लाह इनामदार यांच्यातर्फे देण्यात येणार आहे. या स्पर्धेचे संयोजन इमरान शेख, अफरोज सर, जमील सर, शेख एजाज, अब्दुल खदीर, इरशाद खान, इरफान बागे आणि शुजा स्पोर्टिंग क्लबचे सर्व पदाधिकारी व सदस्यांनी मिळून केले आहे.

## उद्याच्या सामर्थ्यवान भारतासाठी युवकांनो शिवविचार आत्मसात करा-प्रा.कैलास तुपे

बीड । दिव्य न्युज

शिवजयंती हा केवळ उत्सव नाही, तर तो एक संकल्प आहे, छत्रपती शिवाजी महाराजांच्या आदर्शांचा आणि त्यांच्या संघर्षाचा सन्मान करण्याचा दिवस आहे. त्यांच्या विचारांना आपल्या आयुष्यात उतरवून त्यांच्या पराक्रमाची आणि नेतृत्वाची प्रेरणा घेऊन उद्याच्या सामर्थ्यवान भारतासाठी युवकांनी शिवविचार आत्मसात करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन शिवचरित्रकार, प्रसिद्ध व्याख्याते प्रा.कैलास तुपे यांनी व्यक्त केले. बीड येथील तुलसी शैक्षणिक समूहाच्या वतीने बुधवार दि. १९ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३२५ व्या जयंतीनिमित्त तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात आयोजित विशेष व्याख्यान कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.

या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून बीड येथील देवगिरी प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा.प्रदिप रोडे तर विचार मंचावर तुलसी आयटी कॉलेजचे प्राचार्य प्रा.डी.जी.निकाळजे, तुलसी फॅशन कॉलेजचे प्राचार्य डॉ.अशोक दुलदुले, तुलसी नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य मिलिंद वडमारे, तुलसी ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य प्रकाश ढोकणे, तुलसी इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या उमा जगतकर आदि उपस्थित होते

## उदरनिर्वाहासाठी लहानग्यांच्या जीवघेण्या कवायती ; डोंबारी खेळांकडे नागरिकांचे दुर्लक्ष;बघणारे डोळे आणि देणारे हातही कमी झाले

लिंबागणेश । दिव्य न्युज

शिक्षणाचा गंध नसलेल्या डोंबारी समाजाची कथा आणि व्यथा वेगळीच असल्याने या समाजातील लहानग्यांना दोरी वर वेगवेगळी प्रात्यक्षिके करावयास लाऊन त्यातून मिळणाऱ्या पैशातून कुटुंबाचा उदरनिर्वाह करावा लागतो. एकीकडे केंद्र आणि राज्य सरकार शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी विविध स्तरांवर प्रयत्न करत असल्याचे दाखवत असताना वास्तव वेगळेच असुन ५ ते १० वर्षाच्या कोवळ्या जिवांना जीवघेण्या कसरती करायला लाऊन त्यातून मिळणाऱ्या पैशांवर उदरनिर्वाह करत असल्याचे भयान वास्तव ग्रामीण भागात दिसून येते. शिक्षण, विकास आणि आधुनिकतेचा स्पर्श न झालेला हा डोंबारी समाज रस्त्याच्या कडेला तसेच बाजारपेठेत पारंपरिक डोंबारी कला सादर करत नाच व खेळ याच संगम साधत टीचभर पोटाची खळगी भरण्यासाठी लोकांसमोर कला सादर करून मिळालेल्या उदरनिर्वाह करीत आहेत.

डोंबारी खेळांकडे नागरीकांचे दुर्लक्ष ; खेळ बघणारे डोळे आणि देणारे हातही झाले कमी : पुर्वी डोंबाऱ्याचा खेळ आला की खेळ पहायला गाव जमा व्हायचे. विविध साहसी खेळ दाखवले जायचे.खेळ झाल्यावर जमलेले बघे लोक १०,२०,५० रूपये द्यायचे परंतु आता खेळ बघणारे डोळे आणि देणारे हातही कमी झाले आहेत. कधी २०० तर कधी नशिबाने ५०० रुपये मिळतात. या खेळातुन पुर्वी चांगली बिदागी मिळत होती व यावर कुटुंबाची उपजीविका चांगली चालत होती.परंतु आजकाल खेळ पाहण्यासाठी लोकांकडे वेळ नाही.गावच्या वेशी जवळ अथवा रोडलगत खेळ सुरू केला तर लोक नजर टाकुन पुढे निघून जातात. त्यामुळे सध्या उपजिविकेचा व्यवसाय अडचणीत आल्याची खंत नागपुरचे रामलाल यांनी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्याशी लिंबागणेश येथे खेळ सादर केल्यानंतर संवाद साधताना बोलावून दाखवली.





दिव्य वार्ता



# मास्तरड्याने केले अल्पवयीन मुलीचं विनयभंग, किनवट तालुक्यातील वाळकी खुर्द येथील घटना..

किनवट । दिव्य न्युज
विशाल भालेराव

किनवट तालुक्यातील इस्लापूर पासून जवळच असलेल्या वाळकी खुर्द येथे पहिली ते चौथी जिल्हा परिषदेची शाळा आहे, तेथील शिक्षक १७ फेब्रुवारी रोजी रजेवर असल्याने कोसमेट येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक समर्थ कोंडीबा ऐकाळे हे शिकविण्यासाठी गेले होते . दुपारी ११ ते २ वाजताच्या दरम्यान इतर विद्यार्थ्यांना घरी पाठवून दोन अल्पवयीन मुलीस यात्रा फिरवतो म्हणून शाळेत व यात्रेतील आकाश पाळण्यात विनयभंग केल्याची घटना घडली आहे, पिडीत मुलीच्या वडीलाने दिलेल्या तक्रारीवरून पोस्को कायद्या अंतर्गत गुन्हा नोंद झाला आहे.

हदगाव तालुक्यातील तामसा येथिल मुख्याध्यापकाने विद्यार्थीनी वर केलेल्या अत्याचाराची घटना ताजी असताना किनवट तालुक्यातील वाळकी खुर्द येथे मुख्याध्यापकाने विद्यार्थीनी वर अत्याचार केल्याची घटना घडली आहे, शिक्षकी पेशेला काळीमा फासणारी घटना घडली असुन पालकांमध्ये तिव्र संताप व्यक्त होत आहे मुख्याध्यापक समर्थ कोंडीबा ऐकाळे फरार झाला असून त्यास शोधण्यासाठी दोन पथके रवाना झाले आहे , सदर घटनेचा तपास अप्पर पोलीस अधिक्षक खंडेराय धरणे, उपविभागीय पोलिस अधिकारी रामकृष्ण मळघने यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक उमेश भोसले, पोलीस उपनिरीक्षक अतूल डाके हे करित आहेत. विद्यार्थ्यांवर अत्याचाराचे घटना दिवसेंदिवस वाढतच असून पालकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे, प्रशासनाने शाळा व परिसरामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवून त्याचे नियंत्रण शाळा व्यवस्थापन समिती व पालकांना द्यावे अशी मागणी पालकांतून होत आहे.






# एकनाथ शिंदे यांच्या निर्णयाची चौकशी करण्याचे देवेंद्र फडणवीसांचे आदेश

## सरकारला ९०० कोटी रूपयांचा चुना लावणाऱ्या जालन्यातील खरपुडी प्रकल्पाची झाडाझडती होणार!

मुंबई । दिव्य न्युज

मुख्यमंत्री असताना एकनाथ शिंदे यांनी जालन्यातील खरपूडी प्रकल्पाला मंजुरी दिली होती. शेतकऱ्यांच्या जमिनी कवडीमोल भावाने खरेदी करून सरकारी दरात त्याच्या किंमती कैकपटीने वाढवून सरकारला ९०० कोटी रुपयांना चुना लावण्यात आला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एकनाथ शिंदे यांनी घेतलेल्या निर्णयाची चौकशी करण्याचे आदेश





विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी नुकतेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून खरपुडी प्रकल्प राबवण्याचा घेण्यात आलेला निर्णय रद्द करण्याची मागणी केली होती. 'अर्नेस्ट अँड यंग' या आंतरराष्ट्रीय संस्थेने हा प्रकल्प व्यवहार्य नसल्याचे स्पष्ट केले होते. मात्र २०२३ मध्ये केपीएमजी या नव्या संस्थेचा अहवाल घेऊन या प्रकल्पाला हिरवा कंदील दाखवण्यात आला. अचानक हा प्रकल्प व्यवहार्य कसा ठरला, असा सवालही दानवे यांनी मुख्यमंत्र्यांना केला आहे.



अधिकारी, भूमाफिया आणि केपीएमजी कंपनीने संगनमत करून बोगस अहवाल तयार केला. शेतकऱ्यांच्या जमिनी कवडीमोल भावाने खरेदी करून त्याच जमिनी चढ्या भावाने सरकारला विकून कोट्यवधींचा गोलमाल करण्यात आला. या चौकशीत अनेकांचे पितळ उघडे पडणार असल्याचे शिवसेनेचे माजी आमदार संतोष सांबरे म्हणाले.

सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकांना दिल्याने एकच खळबळ उडाली आहे.

जालना जिल्ह्यातील खरपूडी येथे सिडकोचा प्रकल्प येणार असल्याची चर्चा होती. त्यामुळे खरपुडी परिसरात अचानक जमिनीचे भाव गगनाला भिडले होते. अनेक भूमाफियांनी खरपुडी परिसरातील शेतकऱ्यांच्या जमिनी कवडीमोल भावाने विकत घेतल्या. मात्र २०१९ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'अर्नस्ट अँड यंग' या स्वयंसेवी संस्थेने दिलेल्या अहवालावरून हा प्रकल्प रद्द करण्याचा निर्णय घेतला. ३१ जुलै २०१९ रोजी या निर्णयावर सरकारी मोहोर उठवण्यात आली. 'अर्नस्ट अँड यंग' या संस्थेने हा प्रकल्प व्यवहार्य नसल्याचे म्हटले होते. त्यानंतर २०२३ मध्ये एकनाथ शिंदे मुख्यमंत्री होताच रद्द करण्यात आलेल्या या प्रकल्पाला पुन्हा जिवंत करण्यात आले. सरकारी अधिसूचना निघाल्यानंतर प्रकल्पासाठी भूसंपादनही सुरू झाले. १.६६ कोटी रुपये प्रति एकर दराने ५०० कोटी रुपयांच्या मावेजाची खिरापतही वाटण्यात आली.

शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे) माजी आमदार संतोष सांबरे यांनी या जमीन घोटाळ्यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार केली. या घोटाळ्याची चौकशी करण्यात यावी अशी मागणीही त्यांनी केली होती. जमीन घोटाळ्यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार केली. या घोटाळ्याची चौकशी करण्यात यावी अशी मागणीही त्यांनी केली होती. या मागणीची दखल घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतेच सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकांना खरपुडी प्रकल्पाच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. २०१९ मध्ये व्यवहार्य नसलेला हा प्रकल्प २०२३ मध्ये अचानक कसा व्यवहार्य झाला? शेतकऱ्यांच्या जमिनी कमी किमतीत घेऊन सरकारला त्या कैकपटीने जास्त किमतीत विकण्यात आल्या. या संपुर्ण प्रकल्पात ९०० कोटी रुपयांचा चुना सरकारला लावण्यात आला असल्याचे माजी आमदार सांबरे यांनी आपल्या तक्रारीत म्हटले होते.












हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०